"Education through self-help is our motto" Karmaveer

# रयत शिक्षण संस्था, सातारा

## कर्मवीर विद्याप्रबोधिनी



कर्मवीर विद्या प्रबोधिनी
उत्कृष्टाकडे वाटचाल

## पद्मभूषण डॉ. कर्मवीर भाऊराव पाटील

# राज्यस्तरीय महाविद्यालयीन प्रश्नमंजूषा स्पर्धा - २०२३

वर्ष १६ वे

नियम व अटी : १) दोन बोनाफाइड विद्यार्थी स्पर्धक असणारा महाविद्यालयाचा एकच संघ या स्पर्धेसाठी पात्र राहील. २) आलेल्या सर्व संघांचे स्पर्धेपूर्वी लॉट्स टाकून पाच संघाचा एक गट याप्रमाणे गट तयार करण्यात येईल. या गटांची प्राथमिक फेरी घेण्यात येईल. ३) या फेरीमध्ये सर्व संघांचा एकूण गुणानुक्रम लावण्यात येईल. त्यातील गुणानुक्रमे पहिले १५ संघ उपांत्य फेरीसाठी पात्र ठरतील. ४) उपांत्य फेरीमध्ये लॉटस् टाकून पाच-पाच संघाचे तीन गट करण्यात येतील. या फेरीमध्ये सर्व १५ संघाचा एकूण गुणानुक्रम लावून पहिले पाच संघ अंतिम फेरीसाठी निवडले जातील. ५) अंतिम फेरीतील गुणानुक्रमानुसार सर्व संघ बक्षीसपात्र ठरतील ६) सर्व फेऱ्यांमध्ये प्रत्येक संघास विषय क्र. १ ते १४ यापैकी कोणतेही ७ प्रश्न व १५ ते १९ पैकी कोणतेही ३ प्रश्न विचारले जातील. ०७) प्रश्न क्र. १ ते १४ च्या बरोबर उत्तरांना प्रत्येकी १० गुण दिले जातील. चुकीचे उत्तर दिल्यास किंवा न दिल्यास तो प्रश्न क्रमाने पुढील संघास विचारला जाईल, त्यांच्या बरोबर उत्तरास पाच गुण दिले जातील. ८) प्रत्येक फेरीत प्रश्न क्र. १५ ते १९ यापैकी ३ प्रश्न विचारले जातील. प्रश्न विचारून पूर्ण झाल्यावर जो संघ प्रथम बझर दाबेल त्याने उत्तर द्यावयाचे आहे. बरोबर उत्तरास १० गुण दिले जातील. चुकीच्या उत्तरास अथवा उत्तर न दिल्यास १० गुण वजा केले जातील. ९) प्रश्न क्र. १ ते १४ च्या उत्तरांस प्रत्येकी १५ सेकंद वेळ दिला जाईल. १०) दोन संघांना समान गुण मिळाल्यास एक जादा राऊंड घेऊन संघाचा क्रम ठरविला जाईल. ११) उपांत्य व अंतिम फेरीमध्ये झटपट फेरीचा (Rapid Fire) अंतर्भाव केला जाईल व या फेरीत ४५ सेकंदात ५ प्रश्न विचारले जातील. १२) शुक्र. दि. १७/ ०३ / २०२३ पर्यंत स्पर्धेची प्रवेश पत्रिका कॉलेजकडे पाठविणे बंधनकारक आहे. १३) स्पर्धेवेळी स्पर्धकाकडे ओळखपत्र, कॉलेज पत्र व वयाचा पुरावा आवश्यक आहे.

## ✻ अभ्यासक्रम ✻

**१) इतिहास:-** आधुनिक भारताचा विशेषतः महाराष्ट्राचा इतिहास ( १८१८ ते १८५७), ब्रिटीश सत्तेची भारतामध्ये स्थापना व कायदे, सामाजिक-सांस्कृतिक बदल, सामाजिक व आर्थिक जागृती, भारतीय राष्ट्रवादाची निर्मिती व विकास, गांधी युगातील राष्ट्रीय चळवळ, भारताच्या स्वातंत्र्याचा इतिहास, स्वातंत्र्योत्तर भारत, संयुक्त महाराष्ट्र चळवळ.

**२) महाराष्ट्रातील निवडक समाज सुधारक महात्मा फुले,** म. गो. रानडे, लोकमान्य टिळक, गोपाळ गणेश आगरकर, राजर्षी शाहू महाराज, डॉ. बाबासाहेब आंबेडकर, महर्षी विठ्ठल शिंदे, महर्षी कर्वे, प्रबोधनकार ठाकरे, कर्मवीर भाऊराव पाटील, क्रांतिसिंह नाना पाटील, लहूजी साळवे, अण्णाभाऊ साठे, सयाजीराव गायकवाड, सावित्रीबाई फुले, पंडीता रमाबाई.

**३) भारताचा भूगोल** (महाराष्ट्राच्या विशेष संदर्भासह) भारताचा प्राकृतिक भूगोल, भारताचा मानवी व सामाजिक भूगोल, लोकसंख्या भूगोल (महाराष्ट्राच्या संदर्भात), भौगोलिक माहिती प्रणाली, GIS, GPS, भारताचा आर्थिक भूगोल,

**४) महाराष्ट्र व भारत-राज्यव्यवस्था आणि शासन:-** भारताचे संविधान, राजकीय यंत्रणा (शासनाची रचना, अधिकार व कार्ये), केंद्र सरकार, केंद्रिय विधीमंडळ, संसदीय समित्या, न्याय मंडळ, राज्य सरकार व प्रशासन (महाराष्ट्राच्या संदर्भात), जिल्हा प्रशासन, ग्रामीण व नागरी स्थानिक शासन, राजकीय पक्ष आणि दबावगट, प्रसारमाध्यमे, निवडणूक प्रक्रिया, सार्वजनिक सेवा, महत्वाच्या घटना दुरुस्त्या.

**५) अर्थव्यवस्था व नियोजन, विकास विषयक अर्थशास्त्र:-** भारतीय अर्थव्यवस्था, ग्रामीण व नागरी पायाभूत सुविधांचा विकास, उद्योग, सहकार, आर्थिक सुधारणा, आंतरराष्ट्रीय व्यापार व भांडवली चळवळ, गरीबीचे निर्देशांक व अंदाज, रोजगार निर्धारणाचे घटक, महाराष्ट्राची अर्थव्यवस्था, सार्वजनिक वित्त व्यवस्था आणि वित्तीय संस्था, वाढ विकास व आंतरराष्ट्रीय अर्थशास्त्र, नियोजन आयोग, पंचवार्षिक योजना

**६) मूलभूत विज्ञान:-** (इयत्ता दहावी पर्यंतच्या अभ्यासक्रमावर आधारित) भौतिकशास्त्र, रसायनशास्त्र, प्राणीशास्त्र, आरोग्यशास्त्र, वैज्ञानिक शोध, संशोधन, वैज्ञानिक संघटना.

**७) कृषी :-** भारतीय कृषिव्यवस्था, ग्राम विकास व सहकार, राष्ट्रीय अर्थव्यवस्थेत कृषीचे महत्व, ग्रामीण कर्जबाजारीपणा, कृषी प्रतवारीची समस्या, अन्न व पोषण आहार, जमिनीचा वापर व पिके, कृषी परिस्थितीकी हवामान, मृदा, जलसंधारण, राष्ट्रीय अर्थव्यवस्थेत कृषीचे महत्व, कृषीतंत्रज्ञान, कृषीविकास.

**८) पर्यावरण:-** पर्यावरणशास्त्र परिस्थितीकी (Ecology), जैववैविध्य (Biodiversity), हवामान बदल (Climate Change), ऊर्जा प्रवाह, अन्न शृंखला, पर्यावरणीय अवनती संवर्धन, हरित गृह परिमाण,जागतिक तापमानातील वाढ, जैवविविधतेतील घट व वनांचा ऱ्हास, पर्यावरण संरक्षण कायदे, सागरी संरक्षित क्षेत्र, जागतिक परिस्थितीकी असमतोल, पर्यावरण संरक्षण राष्ट्रीय व आंतरराष्ट्रीय परिषदा.

**९) मानवी हक्क :-** मानवी हक्क व शैक्षणिक धोरणे, जागतिक मानवी हक्क प्रतिज्ञापत्र, मानवी हक्काची आंतरराष्ट्रीय व राज्यस्तरावरील यंत्रणा / आयोग, आजपर्यंतची सर्व शैक्षणिक धोरणे.

**१०) तंत्रज्ञान :-** अवकाश तंत्रज्ञान, अणूतंत्रज्ञान व भारताचे अण्विक धोरण, जैव तंत्रज्ञान, अपारंपरिक उर्जास्त्रोत, संगणक व माहिती तंत्रज्ञान, आपत्ती व्यवस्थापन, नॅनोतंत्रज्ञान इ.

**११) क्रीडा-** महत्वाचे राष्ट्रीय आंतरराष्ट्रीय खेळ, खेळाडू, मैदाने, विविध क्रीडा, संज्ञा, क्रीडाविषयक उल्लेखनीय नोंदी, क्रीडा स्पर्धा,

**१२) राष्ट्रीय आणि आंतरराष्ट्रीय पुरस्कार व त्यांचे स्वरुप:-** साहित्य व कला, विज्ञान, क्रीडा, सामाजिक, शैक्षणिक यासंबंधी विविध व्यक्ती व संघटना यांनी प्राप्त केलेले पुरस्कार.

**१३) चालू घडामोडी (राज्य, राष्ट्रीय व आंतराष्ट्रीय स्तरावरील सर्व क्षेत्रातील महत्वाच्या घडामोडी):-**जानेवारी २०२२ ते डिसेंबर २०२२.

**१४) साहित्य संस्कृती व कला:-** भारतीय भाषांमधील साहित्य व पुरस्कार, कला सादरीकरण - नृत्य, नाटक,सिनेमा, तमाशा, लावणी, पोवाडा, भारुड, लोककला व लोकनृत्य, राष्ट्रीय व राज्यातील उत्सव.

**१५) ऑडिओ व व्हिडीओ प्रश्न :-** आवाज ऐकून व्यक्ती ओळखणे/ वाद्य ओळखणे / भाषणाचा प्रसंग ओळखणे किंवा गाणे ऐकून गायक/ चित्रपट / दिग्दर्शक/ संगीतकार / गीतकार ओळखणे किंवा फोटो पाहून त्यातील व्यक्ती ओळखणे (शास्त्रज्ञ, खेळाडू, समाज सुधारक, लेखक, राजकीय व्यक्ती), प्रसिध्द इमारती, प्रेक्षणीय स्थळे किंवा चित्रपटातील, नाटकांतील प्रसंग पाहून त्यातील कलाकार/ चित्रपट नायक/त्यांचे नाव / नाटककार / दिग्दर्शक, प्रसिध्द संशोधक केंद्रे, जैवविविधता, वैशिष्ट्यपूर्ण प्राणी, पक्षी, वनस्पती इ. ओळखणे.

**१६) झटपट फेरी (Rapid Fire):-** वरील अभ्यासक्रमांवर आधारित झटपट फेरी (Rapid Fire) उपांत्य व अंतिम फेरीसाठी.

**१७)** स्पर्धकांची निवासाची व दुपारच्या भोजनाची व्यवस्था मोफत केली जाईल.

**स्पर्धेचा कालावधी**
दि. २४ व २५/०३/२०२३

**स्पर्धा उद्घाटन**
शुक्रवार दि. २४ /०३/२०२३ सकाळी १०.०० वा.

**स्पर्धेचे ठिकाण**
एस.एम.जोशी कॉलेज,
हडपसर, पुणे - २८

**संघासाठी प्रवेश फी रू. १०००/-**

### पारितोषिके

१) प्रथम - रू १०,०००/- सन्मानचिन्ह
२) व्दितीय - रू ९,०००/- सन्मानचिन्ह
३) तृतीय - रू ८,०००/- सन्मानचिन्ह
४) उत्तेजनार्थ - रू ७,०००/- सन्मानचिन्ह
५) उत्तेजनार्थ - रू ६,०००/- सन्मानचिन्ह

डॉ. राजेंद्र ठाकरे डॉ. अतुल चौरे प्रा. ऋषिकेश खोडदे डॉ. शहाजी करांडे

संपर्क :- प्राचार्य, एस. एम. जोशी कॉलेज, हडपसर पुणे ०२० २६९९१००१ / ९९७५१७१९७६ / ८१६९४२४५१७ / ८४८३००१००५ / ९४२२९८१५५३

E-mail : smjoshicollege@gmail.com Website : www.rayatshikshansanstha.com

प्रिं.डॉ. एन. एस. गायकवाड
प्राचार्य,
एस.एम. जोशी कॉलेज, हडपसर, पुणे

प्रिं.डॉ. बी. टी. जाधव
कार्यकारी संचालक,
कर्मवीर विद्याप्रबोधिनी

प्रिं.डॉ. शिवलिंग मेनकुदळे
सहसचिव (उ.शि),
रयत शिक्षण संस्था, सातारा.

प्रिं.डॉ. विठ्ठल शिवणकर
सचिव,
रयत शिक्षण संस्था, सातारा.